# मागे वळून पाहताना...

*ऋतुजा जगताप*

अमेरिकेला उच्च शिक्षणासाठी जायचं असं हायस्कूल पासून निश्चित केलेलं ध्येय होतं अणि घरचं वातावरण शैक्षणिक असल्याने घरुन तसा पाठिंबा पण मिळाला. आठ वर्षांहून अधिक काळ लोटला या परक्या देशात. हो परकाच होता तसा. माझ्या घरातून पहिली मुलगी अमेरिकेला येत होती! सगळ्यांना भीती अणि अभिमान असे दोन्ही भाव मनात होते. विमानात बसेपर्यंत आपण एकटेच जात आहोत याची कल्पना सुद्धा आली नाही. पहिले काही दिवस खूप अवघड होते नवीन लोकांमधे रुळायला,नव्या देशाच्या रीतीभातींशी जुळवून घ्यायला. पण निभावला.जेवण अजिबात बनवता येत नव्हते त्यामुळे यूट्यूब वर किंवा घरी फोन करून आईला विचारायचे! वरचा खर्च भागावा म्हणून ठिकठिकाणी केलेले काम. या सगळया अनुभवाने एका छोटया शहरातल्या मराठी माध्यमातून शिकून दुसऱ्या देशात एकटीने प्रवास करणाऱ्या त्या मा झ्याकडे मागे वळून पाहिले की उगाच कौतुक वाटते. असे धाडस सगळ्या मुलींनी एकदा तरी करावे.

आयुष्यात सगळ्याच गोष्टी छान अणि मनासारख्या होतील असं नाही. या प्रवासात खाचखळगे हे आहेतच. महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोक तुमच्या आयुष्यात येतात आणि जातात. काही तुम्हाला शिकवण देतात तर काही तुमच्या सोबत कायम राहतात. महिलांनी स्वतंत्र असलं पाहिजे, झाला पाहिजे असं आईचं नेहमी सांगणे असे अणि ती किती योग्य सांगायची हे एका कटु अनुभवाने शिकवले. या वाईट काळात मैत्रिणी आणि घरापासून दूर असलेल्या, पण तितकेच प्रेम देणाऱ्या कुटुंबाने जॉब आणि घर नसताना खूप आधार दिला. संकटं येतात म्हणून त्यापासून पळू नये तर त्याला धैर्याने सामोरे जावे. त्यातून एक नवी व्यक्ती जन्माला येते. घडलेल्या गोष्टी आपल्या हातात नसतात किंवा कोण आपल्याबद्दल काय मत मांडते यातही किती वास्तव आहे हे महत्वाचे नाही. प्रत्येकाचा प्रवास वेगळा आहे. सुख अणि समाधान हे स्वतःमधून घडतात, तरच ते दुसऱ्याला देता येतील. या अनुभवातून एक चांगली शिकवण मिळाली की जी व्यक्ती आपल्याला पुढे कधीही कुठेही भेटेल तिच्याशी नेहमीच माणुसकीने वागलं पाहिजे कारण ती कुठल्या परिस्थितीमधून जात असते याची जाणीव आपल्याला नसते.

महिला कुठल्याही वर्णाची, वयाची किंवा कुठल्याही क्षेत्रातली असली तरी तिला वयाच्या प्रत्येक टप्प्यात स्वतःला सिद्ध करायला नेहमीच संघर्ष करावा लागतो. याचे अद्ययावत उदहारण म्हणजे यू.एस.ए. च्या या सत्राच्या राष्ट्रपतीपदासाठी निवडणुकीत एक महिला उमेदवार आहे याचा खूप कौतुक वाटतं. इतक्या संपन्न आणि प्रगत देशात एका महिलेला राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक लढवायला इतका काळ लोटला हे नवलच. मागे वळून माझ्या भारताकडे पाहीलं की आपला देश अमेरिकेसमोर छोटा असेल कदाचित पण जिजाऊ, झांशीची राणी लक्ष्मीबाई,सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी आणि प्रतिभाताई पाटील या महिलांनी देशात राजकीय,सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवली याशिवाय 'कल्पना चावलानं' वैज्ञानिक क्षेत्रातही मोलाची कामगिरी बजावली.

मनात कितीही वादळं असली जी रोज तुम्हाला बेभान करतील पण सूर्योदय हा जसा दररोज होतो आणि जग प्रकाशित करतो तसेच आपणही करू शकतो.जीवनातील संघर्ष आहेत तसे स्वीकारून ध्येयापर्यंत पोहचण्याचा प्रवास यशस्वी करून साध्य परिणामामुळे इतरांच्या आयुष्याला परिमाण मिळवून देण्यातच जीवनाची सार्थकता असते. याची जाणीव व अनुभवच तुम्हाला जगण्याचे बळ देतात. व्यक्तीचा आत्मविश्वास त्याची कहाणी सांगून जात असते.

jautur@gmail.com